# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| **अतिरिक्त संचालक**<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य-१५(क)/AMB Corner मार्गदर्शक सूचना/ ८८४७-९३९ /२०१९,<br>दि.5/2/२०१९ |


प्रति,

१) **जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद,............ (सर्व)**

२) **जिल्हा शल्य चिकित्सक**
**जिल्हा रुग्णालय,......... (सर्व)**

३) **वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**महानगरपालिका........... (सर्व)**

**विषय :- "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" च्या मार्गदर्शक सूचना.....**

**संदर्भ :- १) केंद्रशासनाच्या सन एप्रिल २०१८ मधील Anemia Mukt Bharat (I-NIPI) च्या मार्गशर्दक सूचना....**

**२) या कार्यालयाच्या AMB कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना. दि.८.१२.२०१८**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन रक्तक्षय ही बालके व किशोरवयीन मुला-मुलींमध्ये प्रजननक्षम स्त्रिया व गर्भवती व स्तनदा मातांमध्ये आढळणारी फार मोठी समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने "ॲनिमिया मुक्त भारत" अभियान हा कार्यक्रम राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. रक्तक्षयामुळे शारिरीक वाढ योग्य रितीने न होणे, शारिरीक कार्यक्षमता कमी असणे, बालकांची शारिरीक व बौध्दिक वाढ कमी होणे, संसर्गजन्य रोगास बळी पडणे यांसारखे दुष्परिणाम होतात. यासाठी बालके व किशोरवयीन मुले-मुलीं, प्रजननक्षम स्त्रिया, गर्भवती व स्तनदा माता यांच्यातील लोहाची कमतरता / रक्तक्षय ओळखून / तपासून त्यावर उपचार करण्यासाठी "ॲनिमिया मुक्त भारत" अभियानाची सुरवात करण्यात आलेली आहे. सदर अभियान राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना संदर्भ क्रमांक २ अन्वये आपणास या पुर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी या कार्यक्रमाची मोठया प्रमाणावर प्रसिध्दी व जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच लोकांमध्ये या कार्यक्रमाबाबत संवेदनशीलता निर्माण करणेही आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सर्व आरोग्य संस्थांमध्ये ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाची जनजागृती करण्यासाठी व कार्यक्रमाबाबतचे सनियंत्रण करण्यासाठी "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" स्थापन करण्याचे योजले आहे. या "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" चा मुख्य उद्देश सर्व आरोग्य संस्था व कार्यालयातील महिला कर्मचा-यांच्या हिमोग्लोबीनची पातळी वाढविणे व

ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाची जनजागृती करणे हा आहे. "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" स्थापन करण्याच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

- **"ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" साठी आवश्यक साहित्य -**
  १) टेबल व दोन खुर्च्या
  २) हिमोग्लोबीनो मीटर (डिजीटल/ साहिलस्)
  ३) स्वच्छ पाणी पुरवठा
  ४) आयएफए गोळया (लाल रंगाच्या)
  ५) जंतनाशक गोळया
  ६) नोंद रजिस्टर

- **"ॲनिमिया मुक्त भारत कोपरा"च्या ठिकाणी लावावयाचे प्रसिध्दी साहित्य -**
  १) एएमबी कॉर्नरचे फलक
  २) काय करावे व काय करु नयेचे पोस्टर (Do's and Don'ts)
  ३) ४ मंत्र पुस्तिका
  ४) लोह समृदध् पाककृतींची पुस्तिका
  ५) संदेश कार्ड
  ६) एएमबी पोस्टर्स (विविध वयोगटानुसार)

- **प्रशिक्षित मनुष्यबळ** - रक्तक्षयाच्या तपासणीसाठी व तपासणी नंतर उपचार व समुपदेशनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असावे.

- **कार्यपध्द्ती** - ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाच्या विशेष जनजागृतीसाठी व अंमलबजावणीसाठी वर दिलेल्या साहित्य सामुग्रीनुसार "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" सर्व आरोग्य संस्था (प्राथमिक आरोग्य केंद्र/गामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय/जिल्हा रुग्णालय/स्त्री रुग्णालय) मध्ये तसेच आरोग्य विभागाच्या कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात यावे. यासाठी विशेष दर्शनिय जागा निवडण्यात यावी.
  १) सर्व संस्थामध्ये "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" येथे दर महिन्यातुन एकदा संस्थेतील सर्व महिला कर्मचा-यांसाठी तपासणी - उपचार - समुपदेशन सत्र अयोजित करण्यात यावेत. (टेस्ट - ट्रिट आणि टॉक)
  २) साधारणतः दुपारच्या वेळेत सदर सत्र आयोजित करण्यात यावेत.
  ३) सर्व कर्मचारी महिलांची (प्रजननक्षम (२० ते ४९) वयोगटातील स्त्रिया, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता) हिमोग्लोबीनोमीटरने रक्त तपासणी करुन सौम्य/मध्यम/तीव्र रक्तक्षय असलेल्या महिलांची यापुर्वी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार वर्गवारी करावी व आवश्यक उपचार दयावेत.
  ४) रक्तक्षय नसलेल्यांसाठी आठवडयातील एक दिवस ठरवून सर्व कर्मचारी महिलांना एकत्र करुन प्रतिबंधात्मक डोस (गोळी) देण्यात यावा.
  ५) सौम्य आणि मध्यम रक्तक्षय असलेल्या लाभार्थ्यांना उपचारात्मक डोस देण्यात यावा.
  ६) तिव्र रक्तक्षय असलेल्या लाभार्थ्यांना उपचारासाठी संदर्भीत करण्यात यावेत.
  ७) रक्तक्षय आढळलेल्या सर्व लाभार्थ्यांना रक्तक्षय कमी करण्यासाठी आवश्यक समुपदेशन देण्यात यावे.

- **जबाबदारी** – "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" च्या सनियंत्रणासाठी खालील गोष्टींबाबतची नोंद ठेवणे गरजेचे आहे.

  १) उपलब्ध साठा -: २० ते ४९ वयोगटातील सर्व लाभार्थ्यांच्या "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" सत्रासाठी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी रुग्णालय प्रमुखांची असेल.

  २) जिल्हा आरोग्य अधिकरी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकिय रुग्णालय व कार्यालय येथील "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा"साठी आएएफ गोळयांचा पुरवठा करावा. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील येणारे व महानगरपालिकांना यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील येणारे शासकिय रुग्णालये व शासकिय आरोग्य कार्यालय येथील एएमबी कॉर्नरसाठी आयएफए गोळयांचा साठा पुरवावा.

  ३) "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" येथे घेण्यात आलेल्या सत्रांची नोंद, तपासणी केलेल्या लाभार्थ्यांची संख्या, प्रतिबंधात्मक व उपचारात्मक डोसेस दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या याबाबतचे नोंद असलेले रजिस्टर अद्यावत ठेवण्यात यावे. सोबत रजिस्टरचा नमुना जोडण्यात येत आहे.

- **नोडल अधिकारी**

  – **जिल्हा** रुग्णालयस्तरावर मेट्रन या "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" च्या नोडल अधिकारी असतील.

  – जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयीन स्तरावर पीएचएन या "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" च्या नोडल अधिकारी असतील.

  – उपजिल्हा रुग्णालय /ग्रामीण रुग्णालय/स्त्री रुग्णालय या स्तरावर सिस्टर इंनचार्ज "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा"च्या नोडल अधिकारी असतील.

  – प्रा. आ. केंद्र स्तरावर LHV यांनी ही जबाबदारी पार पाडावी.

- **अहवाल सादरीकरण** – "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा" चा जिल्हयाचा एकत्रित अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये दरमहा nipiamb2018@gmail.com या ईमेल आयडीवर सादर करावा.

ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाची प्रगती व निष्पती याचा आढावा केंद्र शासनामार्फत घेण्यात येत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या "ॲनिमिया मुक्त भारत कोपरा"चा लाभ होईल, याची दक्षता घ्यावी. वर दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.

**(डॉ. अर्चना पाटील)**
**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा ,**
**कुटुंब कल्याण , माताबाल संगोपन व शालेय आरोग्य , पुणे**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१) उपसंचालक , आरोग्य सेवा मंडळ ... सर्व
२) मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद .... सर्व

**प्रत सविनय सादर :-**

१) मा. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
३) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

# अनेमिया मुक्त भारत कोपरा रजिस्टर

| | | फेब्रुवारी | | | | मार्च | | | | | एप्रिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्रं | लाभार्थ्यांचे नाव | wk1 | wk 2 | wk 3 | wk4 | wk1 | wk 2 | wk 3 | wk 4 | wk 5 | wk1 | wk 2 | wk 3 | wk4 | wk5 |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | | | | | | | | | | | | | | | |
| १७ | | | | | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | | | | | | | | | | |
| १९ | | | | | | | | | | | | | | | |
| २० | | | | | | | | | | | | | | | |
| २१ | | | | | | | | | | | | | | | |
| २२ | | | | | | | | | | | | | | | |
| २३ | | | | | | | | | | | | | | | |
| २४ | | | | | | | | | | | | | | | |
| २५ | | | | | | | | | | | | | | | |

## अनेमिया मुक्त भारत कोपरा मासिक अहवाल माहे..........

| | | फेब्रुवारी | | मार्च | | एप्रिल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्रं. | संस्थेचे नाव | घेण्यात आलेली सत्रे | उपस्थित लाभार्थ्यांची संख्या | घेण्यात आलेली सत्रे | उपस्थित लाभार्थ्यांची संख्या | घेण्यात आलेली सत्रे | उपस्थित लाभार्थ्यांची संख्या |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |
| ९ | | | | | | | |
| १० | | | | | | | |
| ११ | | | | | | | |
| १२ | | | | | | | |
| १३ | | | | | | | |
| १४ | | | | | | | |
| १५ | | | | | | | |
| १६ | | | | | | | |
| १७ | | | | | | | |
| १८ | | | | | | | |
| १९ | | | | | | | |
| २० | | | | | | | |
| २१ | | | | | | | |
| २२ | | | | | | | |
| २३ | | | | | | | |

# AMB Corner Reporting format

| Sr. No. | Name of District | Name of Institute ( DH/ SDH/RH/WH/GH/) | AMB corner established (Yes/ No) | IEC Material displayed ( Yes/No) | No of Beneficieries covered | No. of T-T-T Sessions taken | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |